प्रकाशित झाली आहेत, त्यापेक्षा वेगळ्या तऱ्हेच्या पार्श्वभूमीचा कलात्मक वापर करून शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगळ्या—अतिशय महत्त्वपूर्ण पण तितक्याच दुर्लक्षित पैलूचे सहजसुंदर आणि स्वाभाविक दर्शन घडविण्याचा असा प्रयत्न प्रा. श्री. शं. साळुंखे या हौशी चित्रकाराने केला आहे.

व्यवसायाच्या निमित्ताने प्रा. साळुंखे हे कोकणात आले. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या कोकणातील सागरकिनाऱ्यावरच्या वेंगुर्ले या रमणीय गावातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयात ते गेली अनेक वर्षे हिंदीचे कुशल प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत, पण त्यांचा खरा पिंड आहे चित्रकाराचा. त्यामुळेच वेळ काढून ते आपल्या या विश्वात रमतात—कॅनव्हास आणि रंगाची पोतडी घेऊन जगाला आणि स्वतःलाही विसरून वेगळ्याच दुनियेत एकरूप बनून जातात. पण केवळ निसर्गचित्रातच ते रमले नाहीत. उलट तीव्रतेने जाणवली आणि त्यातूनच साकारली गेली. सागराच्या पार्श्वभूमीवर ताठ मानेने उभ्या असलेल्या शिवप्रभूंच्या विजिगीषू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारी चित्रे. त्यांच्या या चित्रांमुळे शिवप्रभूंच्या जीवनातील दुर्लक्षित राहिलेल्या एका मोलाच्या पैलूचे अतिशय प्रभावी दर्शन घडते, यात शंकाच नाही.

प्रा. साळुंखे हे कलावंतांची खाण मानल्या गेलेल्या करवीर जिल्ह्यातले. कवठे बुलंद या खेडेगावातील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला आणि या कुटुंबातीलच नव्हे तर या गावातील कोणी घेतला नव्हता असा एक ध्यास त्यांनी बालपणापासूनच घेतला. लहानपणापासूनच हुशार असलेल्या या मुलाला वेड होते ते इतिहासाच्या पुस्तकातील चित्रे रंगविण्याचे—अं हं ! सामान्यतः आढळते तसे तसले नव्हते. पुस्तकातील चित्रे विद्रुप बनवण्याचे नव्हे तर ती चित्रे पाहून जशीच्या तशी रंगविण्याचे. त्यांचे हे वेड इतक्या

प्रा. साळुंखे यांची शिवरायांची छायाचित्रे

□ **प्रा. मोहन पवार**
कोल्हापूर

छत्रपती शिवरायांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या काळातील निःसत्त्व बनलेला समाज भारावून गेला आणि त्यातूनच हिंदवी स्वराज्य साकारले. त्या काळातील लोकांना तर शिवरायांच्यामुळे प्रेरणा आणि स्फूर्ती मिळालीच पण त्यानंतरही शतकानुशतके—अगदी आजपर्यंत अनेक क्षेत्रातील लोकांना मिळत राहिलेली आहे. आजही शिवरायांच्या जयघोषाने पराक्रमाचे स्फुल्लिंग फुललेले आढळते, ते याचमुळे होय. या कारणामुळेच त्या अलौकिक कर्तृत्वाच्या भव्यदिव्य व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न सर्वच क्षेत्रातील कलावंतांनी—मग तो लेखक असो की कवी, चित्रकार असो की शिल्पकार—या सर्वांनी आपापल्या परीने केलेला आढळतो. यातूनच शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकांगी पैलू उजळून निघालेले आढळतात. असाच एक प्रयत्न कोकणातील एका हौशी चित्रकाराने अतिशय कल्पकतेने केलेला आढळतो. आतापर्यंत शिवरायांची जी चित्रे बालपणापासूनच ज्या शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाने ते भारले गेले होते, त्यांच्या कर्तृत्वाचे अनोखे दर्शन घडविण्याची—त्यांच्या दुर्लक्षित पैलूकडे लक्ष वेधण्याची प्रेरणा त्यांना या परिसराने दिली. आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील कलावंतांनी रेखाटलेल्या शिवरायांच्या चित्रांमुळे पराक्रमी आणि कर्तृत्वशाली शिवराय लोकांच्या नजरेसमोर आले असतील, पण त्यातून सागरी वर्चस्वाचे महत्त्व अचूक ओळखणारा दूरदृष्टीचा हा 'जाणता राजा' कितीसा जाणवला हा प्रश्नच आहे. या कोकणभागातील वास्तव्यामुळे प्रा. साळुंखे यांच्या मनात हा प्रश्न निर्माण झाला. या किनारपट्टीवरच्या प्रदेशातील अनेक उध्वस्त अवशेष, शिवरायांचे हे वेगळेपण आजही आपल्या उराशी जपून आहेत. त्यांच्याशी भावनिक ऐक्य साधणाऱ्यांना शिवरायांच्या कर्तृत्वाची, पराक्रमाची यशोगाथा ऐकवीत आहेत. अशा अवशेषांचे उत्कट भक्तिभावाने दर्शन घेत असताना प्रा. साळुंखे यांना ही खंत पराकोटीला पोचले की, या पोराला वेड तर लागणार नाही ना, याची चिंता घरच्या माणसांना वाटू लागली. तर त्याच वेळी आजूबाजूच्या लोकांना त्यांचे कौतुकही वाटू लागले होते. सुदैवाने त्यांच्या शाळेतील झारी या सायन्सचे पदवीधर असलेल्या मुख्याध्यापकांचे आणि श्री. टी. डी. पाटील या शिक्षकांचे प्रोत्साहन त्यांना लाभले. या प्रोत्साहनाने त्यांच्या कलावंत मनाची ओढ हळूहळू वाढू लागली. फारसे प्रोत्साहक वातावरण नसणाऱ्या कुटुंबात आणि ग्रामीण भागात वावरत असूनही साळुंखे यांच्या मनातील हा चित्रकलेचा अंकुर वाळून न जाता चांगलाच फोफावला—नव्हे, त्यांचे जीवनच व्यापून टाकणारा ठरला तो केवळ करवीर परिसरातील काही चांगल्या परंपरांच्यामुळे होय. या भागातील अनेक यात्रांच्या प्रसंगी वेगवेगळ्या कलाप्रवृत्तींना वाव मिळावा यासाठी प्रदर्शने भरविली जातात. अशा प्रदर्शनातून लहानग्या साळुंखेची चित्रे प्रशंसा मिळवून गेली, त्यांना अधिकाधिक प्रेरणा देऊन गेली. नरसोबाच्या

वाडीला महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या यात्रेत त्यांच्या जलरंगातील शिवाजी महाराजांच्या चित्राला 'पारितोषिक मिळाले. पुढे तेच चित्र मोठ्या गौरवाने त्यांच्या शाळेत लावण्यात आले. या कौतुकाने त्यांच्या अंत:करणातील चित्रकलेचे प्रेम अधिकच दृढ झाले. रसिकांची दाद मिळू लागली. पुढे शिक्षणासाठी इंचलकरंजी येथे आल्यानंतरही शाळेच्या स्नेहसंमेलनानिमित्त भरविलेल्या प्रदर्शनासाठी त्यांनी शिवाजी महाराजांचेच चित्र रेखाटले व त्यालाही पारितोषिक मिळाले.

चित्रकलेचे वेड असले तरी त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले नव्हते. पण ठिकठिकाणी त्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे कौतुक होऊ लागले, त्यांना पारितोषिके मिळू लागली आणि त्यामुळे त्यांच्या मनात चित्रकलेचा ध्यास सुरू झाला. या ध्यासानेच त्यांच्यामध्ये एक वेडी ओढ निर्माण झाली—ती म्हणजे चित्रकला शिक्षक बनण्याची. मग साऱ्या प्रतिकूलतेला खंबीरपणे तोंड देऊन ते कोल्हापूरला आले. तेथे त्यांना मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रसंगी आर्थिक साहाय्य लाभले ते श्री. रा. ग. जगताप या शिक्षकाचे. या आधारावर वाटचाल करतानाच त्यांनी रेखाटलेल्या छत्रपती शहाजी महाराजांच्या चित्राने त्यांचे फार कौतुक झाले. वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळण्याचा मोलाचा आणि आनंदाचा तो क्षण. या कौतुकामुळे आपले ध्येय पुरे करण्यासाठी त्यांनी डी.टी.सी. ची प्रवेश परीक्षा दिली. पण काही अपरिहार्य कारणामुळे त्यांना त्या ठिकाणी प्रवेश मिळू शकला नाही. त्यामुळे त्यांना असह्य यातना झाल्या हे खरे पण आजच्या त्यांच्या यशस्वी जीवनाच्या दृष्टीने ही घटना मोलाचीच मानावी लागेल. पुढे त्यांनी अर्धवेळ शिक्षकाची जागा मिळविली व त्याचवेळी महाविद्यालयीन शिक्षणही पुरे करून घेतले. मधल्या काळात त्यांच्या किर्ती कॉलेजने भरविलेल्या प्रदर्शनातील त्यांच्या रविंद्रनाथ टागोरांच्या चित्राने या प्रदर्शनाचे परीक्षक असलेले सुप्रसिद्ध सिनेकलावंत व चित्रकार श्री. चंद्रकांत मांढरे यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी या चित्रातले कलागुण हेरले व या उदयोन्मुख चित्रकाराच्या कसबाची तरफदारीही केली. अशा तऱ्हेने गौरविले गेलेले हे रविंद्रनाथ टागोर यांचे चित्र त्यांच्या कॉलेजमध्ये लावले गेले आणि हेच एका श्रेष्ठ कलावंत चित्रकाराचे चित्र या नव्या चित्रकाराला पुढे आणावयाला कारणीभूत ठरले. प्राचार्य पी. जी. पाटील यांनी त्यांचे कलागुण पाहून प्रसिद्धीच्या झोतात नसतानाही या तरुण कलावंताला म. फुले, छ. शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांची तैलचित्रे काढण्याची ऑर्डर दिली. त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ही घटना त्यांना आणखी एका दृष्टीने मोलाची वाटली. ही कामगिरी पत्करल्यामुळे करवीर नगरीचे भूषण असलेले सुप्रसिद्ध चित्रकार व शिल्पकार श्री. रविंद्र मेस्त्री यांच्याबरोबरचे त्यांचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे व सलोख्याचे बनले. प्रथमच व्यावहारिकदृष्ट्या रंगवावयाला घेतलेल्या या मोठ्या चित्रांच्याबाबत काही अडचणी निर्माण झाल्याबरोबर साळुंखे हे श्री. रविंद्र मेस्त्री यांच्याकडे धावले होते. त्यावेळी त्यांनी मार्गदर्शन तर केलेच पण सर्वप्रकारचे सहकार्यही दिले.

साळुंखे हे हळूहळू अशी प्रगती करत असतानाच त्यांना कोल्हापूर येथील गोखले महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. त्याचवेळी याच संस्थेच्या कोकणातील वेंगुर्ले येथील महाविद्यालयातही हिन्दीच्या प्राध्यापकाची जागा रिकामी झाली होती. तेथे जाण्याची संधी त्यांना मिळाली. कोकणातील निसर्गसंपन्न वातावरणात नोकरी स्वीकारण्यापलीकडे त्यांच्या कलावंत मनाला रुचण्यासारखे अधिक काय होते ? तेथे त्यांच्या चित्रकलेला उभारी लाभली. पण त्यापेक्षाही



□ इतिहासप्रसिद्ध रांगणा किल्ला. प्रा. श्री. शं. साळुंखे यांनी रंगविलेल्या एका चित्राचे छायाचित्र

त्यांच्या मनाने घेतलेला ध्यास मोलाचा ठरला.

सागरावर स्वामित्त्व ठेवणे महत्त्वाचे आहे हे ओळखून नवे जंजिरे उभारून, जुन्यांची देखभाल करून इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांच्यासारख्या सागरावर वर्चस्व ठेवणाऱ्या बलाढ्य शत्रूंनाही दशहत निर्माण करणाऱ्या शिवरायांचे कर्तृत्व लोकांच्यासमोर फारसे आलेले नाही. छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वाचा हा पैलू लेखनातून काय, शिल्पातून काय किंवा चित्रातून काय फारसा उजळून निघालेला दिसत नाही. या भागातल्या वास्तव्यामुळे या उणिवेची जाणीव होताच प्रा. साळुंखे यांनी शिवरायासंबंधी उपलब्ध असलेले लेखन डोळसपणे अभ्यासावयाला सुरुवात केली. ज्यांनी शिल्पाकृती आणि चित्राकृतीतून शिवराय उभे केले आहेत त्या आपल्या गुरुतुल्य स्नेह्यांशी—श्री. रविंद्र मेस्त्री यांच्याशी चर्चा केली. या चर्चेतूनच दोघांनी मिळून अनेक रेखाटने तयार केली व अखेरीस सागरावर डौलाने आणि अभिमानाने भिरवणाऱ्या गुराब्यावर चौफेर दृष्टिक्षेप टाकत असलेल्या विजिगीषू वृत्तीच्या 'सागराधिपती शिवरायां'चे चित्र त्यांनी तयार केले. शिवरायांबद्दलच्या अनेकांच्या कल्पना त्यांनी लक्षात घेतल्या असल्या आणि श्री. रविंद्र मेस्त्री यांचा त्यावर प्रभाव असला तरी आपल्याला जाणवणारा, राजेशाही तेज असलेला आणि

पान २६ पहा

पान ९ वरून

पाहताक्षणीच कर्तबगारीची समर्थ जाणीव करून देणारा युगपुरुष या चित्रांतून दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

शिवरायांचे हे चित्र रंगवीत असतानाच त्यांच्याकडे एक फार मोठी सुसंधी चालत आली ती त्यावेळचे त्याठिकाणचे बांधकाम खात्याचे प्रमुख अभियंता श्री. अनिल घोरपडे यांच्यामुळे होय. या रसिक वृत्तीच्या अधिकाऱ्याने प्रा. साळुंखे यांचे कसब पाहिले, या भागा-विषयीची आस्था पाहिली आणि त्यांच्याकडून विविध ठिकाणच्या विश्रामधामात लावण्यासाठी कोकणचे सौंदर्य दाखविणारी तैलचित्रे मुद्दाम तयार करून घेतली. याच दरम्यान रत्नागिरी जिल्हयाचे विभाजन होण्याचे नक्की झाले होते. नव्या जिल्हयाला शिवप्रभूंनी निर्माण केलेल्या आणि त्यांच्या कर्तृत्वाचे द्योतक ठरलेल्या सिंधुदुर्ग किल्ल्यावरून सिंधुदुर्ग जिल्हा हे नाव द्यावयाचे निश्चित झाले होते. अशा परिस्थितीत मालवणच्या विश्रामधामात केवळ निसर्गचित्र लावण्याऐवजी वेगळे चित्र लावण्याची कल्पना श्री. घोरपडे यांच्या मनात आली. प्रा. साळुंखे यांनी रेखाटलेल्या शिवरायांच्या वेगळ्या चित्रामुळे हा विचार त्यांच्या मनात आला होता. पण त्या चित्रातही बदल करण्याचे ठरले आणि त्या कल्पनेनुसार नवे चित्र साकारले. हे त्यांचे नव्या दृष्टीचे आणि आव्हान मिळालेले चित्र. सुमारे दोन मीटर उंचीच्या शिवरायांच्या या चित्राला त्यांच्या अजिंक्य शिवलंकेची—त्यांच्या कर्तृत्वाचा मानबिंदू ठरणाऱ्या सिंधुदुर्ग किल्ल्याची पार्श्वभूमी लाभलेली आहे. या चित्रामुळे आपली एक मनोकामना पूर्ण झाल्याचे समाधान त्यांना लाभले आहे.

अलिबाग तालुक्यातील ' रेवदंडा ' किल्ल्यात मुंबईच्या गिर्यारोहकांना जे " भुयार " सापडले त्याप्रीत्यर्थ रेवदंडा श्रीक्षेत्र चौल नगरीचा हा थोडक्यात पूर्वेतिहास



☐ रेवदंडा किल्ला

रेवदंडा चौलवर स्वारी

रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यामध्ये निसर्ग सान्निध्यात असलेल्या ' रेवदंडा ' येथे सागर किनारी फार पुरातन काळापासून भग्नावस्थेत भव्य किल्ला आहे. तेथे जुलै १९८२ मध्ये मुंबईच्या एका गिर्यारोहक पथकातील श्री. अरुण सावंत आणि मंडळीने किल्ल्यातील भुईकोट भागात भुयारी मार्गाचा शोध घेतला. त्या रेवदंडा किल्ल्याचा पूर्वेतिहास थोडक्यात हा असा आहे.

असे म्हणतात की, महाभारतातील श्रीकृष्ण देवाच्या बलराम भावाची पत्नी रेवती हिच्या नावाने हा किनारा प्रदेश ओळखला जाई. रेवदंडा हे रेवतीद्वीप या संस्कृत शब्दावरून बनलेले बोलीभाषेतील नाव. आग्रावचे वयोवृद्ध कार्यकर्ते श्री. मोरेश्वर ऊर्फ मरबा पाटील यांनी अशी माहिती दिली की, रेवीचे पट्टे (वाळूचे पट्टे) हया भागात जास्त होते. वाळू दांडक्याच्या आकाराप्रमाणे दिसते म्हणून हा रेवदंडा !

टिमुल्ल - सिमुल्ल - चिमोले - सैमूद-जैमूद ही सर्व नावे एकाच गावची म्हणजे सध्या अस्तित्वात असलेल्या श्रीक्षेत्र " चौल "चे (चेऊल) होय. इसवी सन १३० ते २४७ मध्ये ही नावे प्रसिद्ध होती. त्यावेळी व्यापारीदृष्टया हा परिसर सुजलाम् सुफलाम् तसेच वैभवशाली होता.

दहा ते बाराव्या शतकात बऱ्याच अरब व्यापाऱ्यांनी भेटी दिल्या. अनेक परदेशी पर्यटकांनी चौलसंबंधी विपुल माहितीची नोंद केलेली आहे. श्रीक्षेत्र शहरात ३६० मंदिरे होती. तितक्याच पुष्करिणी या नगरीत १ लक्ष ६० हजार देखण्या, टुमदार इमारती होत्या. अनेक उद्याने, तट, पोखरणी होत्या. या शहराचा परीघ बारा मैलांचा असून रेवदंडा, थेरोंडा, मळा वगैरे उपनगरे होती. या श्रीक्षेत्र चौलात धनधान्याची समृद्धी होती. नारळ-सुपाऱ्यांच्या बागा होत्या. सुजलाम् सुफलाम् आणि वैभवशाली शहर म्हणजे " चंपावती नगरी " (चौल) होय. येथे उत्कृष्ट पितांबरे तयार होत असत. रेशमी कापडासाठी चीनमधून कच्चा माल आणत.

या निसर्ग सान्निध्यात असलेल्या अष्टागरातील आगरी लोक जमिनींसाठी, कोळी बांधव मत्स्य व्यवसाकरिता अन् भंडारी समाज गगनाला टेकलेल्या नारळी कल्पवृक्षाच्या मद्यासाठी आपल्या निसर्गदत्त काटकपणानी झगडतात म्हणजे कष्ट करतातच. ही श्रीक्षेत्र चौल नगरी पुरातन मजबूत अशी भव्य नगरी होती तसेच रेवदंडा शहर !

इसवी सनाच्या पहिल्या शतकात " सातवाहन " राजाची सत्ता या परिसरात होती. त्यानंतर गुप्त, मौर्य, शिलाहार या राजवटींचे वर्चस्व आले. नवव्या शतकात येथे ' झांज ' राजा राज्य करीत होता. या भागात भारताचा परदेशी व्यापार फार मोठ्या प्रमाणात वाढला. सहाव्या शतकात " श्रीमंत व्यापारी " शहर म्हणून श्रीक्षेत्र चौलची म्हणजे चंपा या नगरीची भरभराट झाली. देवगिरीचे हिंदू यादव, मलिक काफूर, पोर्तुगीज, निजामशहा वगैरेनी येथे राज्य केले. शेवटी १५२१ मध्ये विजापूरच्या आदिलशहाने हल्ला करून चौल चाळून टाकला. निजामशहाबरोबर पोर्तुगीजांचाही पराभव झाला. वास्तविक पोर्तुगीजांसारख्या परकीय सत्तेच्या उच्चाटनाचा हा काळ होता. पण निजामशहाने पोर्तुगीजांचा स्नेह राखला आणि उत्तम जातींच्या घोडयांच्या पुरवठयाच्या मोबदल्यात त्यांनी त्यांना तेथे किल्ला बांधावयाची परवानगी दिली. इसवी सन १५२४ मध्ये पोर्तुगीजांनी ' रेवदंडा ' किल्ला बांधून पूर्ण केला. तेथे पोर्तुगीजांची स्वतंत्र वसाहत उभी राहिली. त्या काळी रेवदंडा-चौल एकत्र होते. पण किल्ला बांधणीनंतर निजामशहाने रेवदंडयाच्या खाडीपलीकडे ' कोरलाई ' किल्ला मजबूत बांधला. १५९४ साली निजामशहा व पोर्तुगीज यांच्यात युद्ध होऊन पोर्तुगीजांनी कोरलाई किल्ला जिंकला. १६०० साली निजामशहाचा पाडाव होऊन चौलचा परिसर अकबर बादशहाकडे आला. १६३१ साली विजापूरच्या आदिलशहाने मोगलांकडून चौल ताब्यात घेतले. दुर्दैवांनी पुन्हा पाच वर्षांनी चौल मोगलांकडेच गेले. १६७२ मध्ये छत्रपती

शिवाजी महाराजांच्या रायगडावरील राज्याभिषेकाला आलेला इंग्रज वकील ऑक्झेंडन रेवदंडा येथे १६७४ साली येऊन गेला. तो रात्री उशीरा रेवदंडा बंदरात उतरल्यामुळे त्याला किल्ल्याचे दरवाजे बंद केल्याने पुन्हा आत घेतले नाही. कारण तेथील कडक शिस्त पालन !

इसवी सन १६८३, १६८६, १६८७, १६९० मध्ये चौलवर अनेकांनी स्वाऱ्या केल्या. शिवाजी महाराजांच्या मृत्युने पोर्तुगीज, सिद्धी, मोगल यांनी घनघोर युद्धे केली. छत्रपती संभाजी महाराजांनी १६८३ साली चौलच्या भोवती मजबूत तटबंदी बांधली. हाच पुढे श्रीक्षेत्र चौलचा राजकोट किल्ला होय. इसवी सन १६९७ मध्ये कान्होजी आंग्रे सिद्धी, मोगल यांच्याशी लढले. अठराव्या शतकाच्या प्रारंभी कान्होजी आंग्रे यांच्या सत्तेचा उदय झाला. त्यांना सावळचा तांडेल या कोळी बांधवाने व त्यांच्या समाजाने बहुमोल सहाय्य केले आहे.

इसवी सन १७४० मध्ये चौदा ऑक्टोबर रोजी पोर्तुगीजांनी रेवदंडा किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन केला. २३५ वर्षे पोर्तुगीज रेवदंडा-चौल परिसरात होते.

१६६६ साली इंग्रजांच्या मार्गदर्शनाने मुंबई नगरीचा विकास होत होता अन् चौल-रेवदंडा या बंदरांचे वैभव कमी कमी होत होते. चौल-रेवदंडा येथे अनेक राजांच्या लढाया, व्यापारात अडथळे, बंदरात साचलेला चिखल, मातीचा गाळ (आजही गाळ बंदरात आहे), असुरक्षितता आदी कारणांनी येथील कष्टकरी प्रजा गांजून गेली होती. पोर्तुगीज, निजामशहा, मराठे, पेशवे, आंग्रे, इंग्रज अशा राजसत्तांनी जवळजवळ चारशे वर्षे श्रीक्षेत्र चौल-रेवदंडा येथे घनघोर युद्धे केली होती. १७८१ पर्यंत रेवदंडा बंदर हे चांगले बंदर होते.

रेवदंडा किल्ल्याचा भारत स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक क्रांतिकारकांनी, देशभक्तांनी भूमिगत होण्यासाठी, ब्रिटिशांविरुद्ध गुप्त खलबते करण्यासाठी उपयोग केलेला असावा असे वाटते.

रेवदंडा किल्ल्यातील आजही काही वस्तू भग्नावस्थेत पाहावयास मिळतात. इसवी सन १५२० ते १७२१ च्या २०० वर्षांपूर्वीच्या इमारती पडझडीत दिसतात. १५४९ मध्ये धर्मगृहे बांधली गेली. किनाऱ्याजवळील तटबंदी



□ श्री. अरुण सावंत व त्यांचे सहकारी भुयाराचा शोध घेत असताना

१५७७ मध्ये उभारण्यात आली. या रेवदंडा किल्ल्याचे उत्तरेकडील द्वार १६३५ मध्ये तर दक्षिणेकडील द्वाराची दुरुस्ती १६३८ मध्ये करण्यात आली. मनोरा १६८८ मध्ये बांधण्यात आला. फ्रान्सिस्कन्स चर्च १५३४ मध्ये बांधलेले आहे. हाच तो "सातखणी" बुरूज ! ९६० फूटांची उंची असून वीस फुटांच्या चौकोनी चौथऱ्यावर बांधलाय तो ! डोमिनिकन चर्च १५४९ मध्ये आणि "हाऊस ऑफ मर्सी" ही इमारत १५५० मध्ये बांधली. रोमच्या धर्तीवर रेवदंडा येथे चर्च पोर्तुगिजांनी बांधले. १७४० मध्ये नानासाहेब पेशवे यांनी हरेश्वर व हनुमंत अशी दोन मंदिरे बांधली. त्याचप्रमाणे रामेश्वर, शितलादेवी, भगवतीदेवी, कुंडेश्वर, श्रीक्षेत्र चौलचा दत्तात्रय अशी जागृत असलेली अनेक मंदिरे आहेत. जान्हवी तळे आहे. तेथे तर आपली मनोइच्छा पुरी होते. अडीअडचणीत जी चिजवस्तू हवी ती जान्हवी तळ्यास 'हाक' मारली असता मिळते असे रेवदंडा कोळी समाज संघाचे क्रियाशील कार्यकर्ते श्री. हरी नथू खंडेराव यांनी माहिती सांगितली.

असा हा श्रीक्षेत्र चौल-रेवदंडा परिसर अनादिकाळापासून आजतागायत निसर्गरम्य सान्निध्यात आहे. रेवदंडा किल्ल्यातील भुयार मजबूत बांधणीचे असून ते कुठपर्यंत गेलेले आहे याचा शोध श्री. अरुण सावंत यांनी घेतला. श्रीचौल-रेवदंडा परिसरात आग्राव कोळीवाडा येथील मार्गात श्रीदेवी शितलादेवी मंदिराजवळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्याच्या पाण्याचे नळ टाकण्याचे कांम चालू असता तेथे 'पोखरण' सापडली व 'निर्मळ पाणी' मिळाले. या मार्गात शिळाही अजून आहे. तेथेही शोध बोध घेतल्यास ऐतिहासिक वास्तू सापडतील. येथे पूर्वी हमामखाना म्हणजे स्नानगृहे होती. श्री गणपती मंदिरही फार काळापासून येथे आहे. भाविक 'श्री' दर्शन वर्षानुवर्षे घेत आहेत. सिद्धी विनायकाची पाषाणमूर्ती सुंदरच आहे. काही वास्तू या परिसरात भग्नावस्थेत दिसतात. श्री दत्ताच्या डोंगरावर काही 'गुहा खोल्या' आहेत. तेथे श्रीदेवी हिंगळादेवीचे स्थान आहे. गुजराती शाळीग्राम समाज तेथे उत्सव करतात.

या परिसरात कोळी, माळी, आगरी, भंडारी, सोनार, प्रभू, ब्राह्मण वगैरे लोक प्राचीन काळापासून वसती करून आहेत.

अशा ह्या रेवदंडा किल्ला परिसरात श्री. अरुण सावंत, हिरा पंडित, दत्ता कोपे, अनंत सावंत, यशवंत सावंत, रमाकांत महाडिक आणि हेमंत पांचाळ यांनी एक भलेमोठे भुयार शोधून काढले. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व खात्याने यांना सर्व बाबतीत मदतीचा हात दिल्यास एक प्रेक्षणीय स्थळ निर्माण होईल. हिंस्त्र श्वापदांनी येथे वस्ती केलेली आहे. चिखल-मातीने भुयार

पान २५ पहा

गिर्यारोहण ही काळाची गरज

□ **दीपक शिरवडकर**

डोंगरी, पूर्वी डोंगराळ असा दक्षिण मुंबईतील हा एक इवलासा भाग. आज येथील डोंगर तसे बघितले तर नामशेष झाले व त्यांची जागा इमारतींनी घेतली ; डोंगर गेले पण ब्रिटीश जमान्यापासून चालत आलेले “ डोंगरी ” हे नाव मात्र अमर राहिले. डोंगरीसारख्या गरीब, दुर्बल, मध्यमवर्गीय विभागामध्ये तरुणांकरता काहीतरी विधायक कार्य झाले पाहिजे या ईर्षेने पेट्रन विलास माळी व सॅमसन शापुरकर यांनी एक योजना मांडली व ती योजना विभागातील तरुण मंडळी अनिल मोकल, शैलेश तोंडवळकर, गजानन मुळे व प्रविण ठाकूर यांनी उचलून धरली. त्यातून विभागामध्ये एक क्लब निर्माण झाला. “ गिर्यारोहण ” या विषयाबाबत तरुणांमध्ये आवड निर्माण करणे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून काहीतरी वेगळे करण्याचा एक प्रयत्न या तरुणांनी केला. डोंगर-कपाऱ्या, नदी-नाले, अवघड चढण पार करणे याला साजेसेच नाव क्लबला देण्यात आले ते म्हणजे “ डोंगरी ”. आपण अमुक एका राजकीय पक्षाचे आहोत किंवा धर्माचे आहोत ही भावना बाजूला ठेवून “ डोंगरी ” क्लब डोंगरी विभागामध्ये जोमाने कार्यरत होत आहे.

शहरी गजबजाट आणि नेहमीची धावपळ यापासून दूर निसर्गाच्या छायेत थोडा वेळ घालवावा, काहीतरी वेगळे करून दाखवावे अशी जिद्द ठेवून “ डोंगरी ” क्लबचे “ गिर्यारोहक ” घनदाट डोंगराच्या कडा-कपाऱ्या चढण्यास जातात. “ एक पाय तळ्यात एक पाय मळ्यात ” ठेवून “ वन ट्री हील पॉईंट ” (माथेरान), “ पेथ फोर्ट ” (माथेरान), “ कवनाई ” (इगतपुरी), “ राजमाची ” (लोणावळा), “ गार्बेट ” (माथेरान), “ माहुली ” (आसनगाव), “ चांदेरी ” (वांगणी), “ इशाळगड ” (१०० फूट सुळका) (कर्जत), “ ढाकबैरी ” (कर्जत) सारखे डोंगर या क्लबच्या चमूने पादाक्रांत केले आहेत. पिकनिकसारखाच एक प्रकार परंतु पिकनिकमध्ये फक्त मजा केली जाते, परंतु या ठिकाणी जीवावर उदार होऊन “ डोंगरी ” क्लबमधील मुले—मुली एकत्र येऊन डोंगर-कपाऱ्या चढताना असलेले चढ-उतार एकमेकांना आधार देऊन पार करतात.

विद्यार्थी जीवन हे एक वय आहे. या वयातच छंद फुलवायचे असतात, वाढवायचे असतात. विद्यार्थी वय हे अगदी कोऱ्या पाषाणासारखे असते. कोऱ्या पाषाणास कोरून जशी मूर्ती घडविली जाते तसेच या विद्यार्थी वयात चांगले छंद अंगी बाणले तर भविष्यात विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो ; या वयात आळस न करता, श्रमाचा विचार न करता झोकून घेतले पाहिजे. याच प्रेरणेने साकार झालेला “ डोंगरी ” क्लबचा चमू डोंगरीसारख्या गरीब, मध्यमवर्गीय वस्तीमध्ये तरुणांना एकत्र आणून “ गिर्यारोहणाचे ” धडे देताना पाहून धन्यता वाटते, तशीच धन्यता वाटते ती या क्लबला आर्थिक बाबतीत उदारपणे मदत करणाऱ्या दात्यांची.

“ गिर्यारोहण ” करणे म्हणजे आपली नजर व मेंदू यांना सतत चालना देणे. “ गिर्यारोहण ” करताना मेंदूची केंद्रे वेगाने कार्यरत होतात त्यामुळे निर्णयशक्ती वाढते, आत्मविश्वास वाढतो. व्यक्ती हुशार, यशस्वी व उत्साही होते. “ डोंगरी ” क्लब फक्त विभागातील तरुणांपुरता न राहता मुंबईतील विविध ठिकाणांतील तरुणांना “ गिर्यारोहण ' करण्याकरिता आज प्रवृत्त करीत आहे. क्लबतर्फे बोरीवली येथे “ काण्हेरी गुंफा ” या ठिकाणी ८ डिसेंबर १९८३ ते ११ डिसेंबर १९८३ रोजी प्रशिक्षण शिबीर आयोजले होते. विविध शाळांतील, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने आज या क्लबचे सदस्य बनत आहेत. क्लबच्या दृष्टीने गर्वाची गोष्ट म्हणजे याच क्लबच्या तरुणांनी “ नागरी संरक्षण दल ” बी विभाग यांच्या कार्यकर्त्यांना “ इमारत विमोचन ” प्रशिक्षण दिले आहे. आज नव-नवीन गिर्यारोहक या क्लबमध्ये येत आहेत व गिर्यारोहण यशस्वीपणे करीत आहेत.

प्रत्येक क्षणी मृत्यूला आवाहन देत अत्युच्च शिखरे पादाक्रांत करणारे “ डोंगरी ” क्लबचे गिर्यारोहक डोंगरी विभागाचे “ डोंगरीपण ” अत्युच्च शिखरावर नेल्यावाचून राहणार नाहीत. अशीच जिद्द आज “ डोंगरी ” क्लबचे गिर्यारोहक दाखवून देत आहेत. गिर्यारोहण ही काळाची गरज ओळखून गरीब, दुर्बल, मध्यम वर्गात गिर्यारोहणासारखे धडे देणाऱ्या, युवकांमध्ये जिद्द निर्माण करणाऱ्या “ डोंगरी क्लब व त्या क्लबचे उद्‌गाते त्याचप्रमाणे जिवावर उदार होऊन डोंगर-कपाऱ्यांशी खेळणारे निधड्या छातीचे गिर्यारोहकांना शुभेच्छा. ब्राव्हो “ डोंगरी ” क्लब.....

पान ११ वरून

यांना सर्व बाबतीत मदतीचा हात दिल्यास एक प्रेक्षणीय स्थळ निर्माण होईल. हिंस्त्र श्वापदांनी येथे वस्ती केलेली आहे. चिखल-मातीने भुयार बुजलेले आहे. ते मजुरांकडून माती-दगड काढून साफ करता येईल. विद्युत प्रकाशाने मार्ग प्रकाशमय दिसेल. पर्यटकांना भुयारात वेगळेच वातावरण व नैसर्गिक सुवास मिळेल. तसेच आनंददायी स्थळ निसर्गरम्य सान्निध्यात पाहाता येईल.

या परिसरात दळण-वळणाची साधने सुव्यवस्थित आहेत. त्यामुळे या परिसरातील 'रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायत' या संस्थेस उत्पन्न मिळेल व शासनास मदत होईल. या परिसरातील अनेक पुरातन वास्तू भग्नावस्थेत आहेत. ती सुधारून जतन केल्यास निसर्गप्रेमी रसिकांना आनंद आनंदच होईल !!!

□□